जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

**प्रेसनोट क्रमांक - ४५४ दिनांक - २९/१०/२०२४**

विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणे शहर

## रेकॉर्डवरील आरोपीकडुन जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस आणुन गुन्हयातील गेल्या मालासह ०२ पिस्टल व ०४ जिवंत काडतुसे हस्तगत

विश्रामबाग पोलीस ठाणे गुरनं ०२३/२०२४ भारतीय दंड संहिता, कलम ३९२ अन्वये दाखल गुन्हयात शास्त्रीरोड, पुणे येथुन फिर्यादी वृध्द महिला ह्या रस्त्याने जात असताना मोटार सायकल स्वाराने गळयातील २० ग्रॅम वजनाची सोन्याची साखळी हिसकावुन नेली होती. सदर गुन्हयाचा तपास करणे बाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती विजयमाला पवार यांनी तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना गुन्हा उघडकीस आणणे बाबत आदेशीत केले होते.

दाखल गुन्हयाचे तपासात विश्रामबाग तपास पथकातील पोलीस अंमलदार सचिन कदम यांनी गोपनीय खबऱ्याचे मदतीने सदरचा गुन्हा हा रेकॉर्डवरील आरोपी नामे **रफिक सलीम खान, वय ३६ वर्षे रा.बि.०७,जिवलग हॉसींग सोसायटी,आयटीए स्किम निगडी,पुणे** याने केल्याचे निष्पन्न केले. आरोपीकडुन गुन्हयातील २० ग्रॅम वजनाची सोन्याची चेन हस्तगत करण्यास आरोपीच्या राहते पत्यावर गेले असता आरोपीच्या घरी **२० ग्रॅम वजनाच्या चैन सह,०२ देशी बनावटीचे पिस्टल व ०४ जिवंत काडतुसे** मिळुन आली. आरोपी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन आरोपी विरुध्द खुन,खुनाचा प्रयत्न,जबरी चोरी,मारामारी असे गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी मा.अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे श्री.प्रवीणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०१ श्री.संदिपसिह गिल्ल, मा.सहा.पोलीस आयुक्त,श्री साईनाथ ठोंबरे यांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली विश्रामबाग पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्रीमती विजयमाला पवार, पोलीस निरीक्षक (गुन्हे),श्री अरुण घोडके, तपास पथकाचे पोलीस उप-निरीक्षक मनोज बरुरे, पोलीस अंमलदार सचिन कदम, मयुर भोसले, अशोक माने, गणेश काठे, सचिन अहिवळे, शैलेश सुर्वे, जाकीर मणियार, कैलास डुकरे, आशिष खरात,अर्जुन थोरात,राहुल मोरे,नितीन बाबर,संतोष शेरखाने व सागर मोरे यांनी केली.


पोलीस ठाणे
पुणे पोलीस
फरासखाना
फोन नं. ०२०२४४५२२५०
विश्रामबाग
फोन नं. ०२०२४४५७७५०
विश्रामबाग पोलीस स्टेशन
पुणे शहर